N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** अवधूतवाडी **Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0530

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/05/2024 00:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 22/12/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/12/2023
**Time From (वेळेपासून):** 15:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/05/2024 **Time (वेळ):** 00:14 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/05/2024 00:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा परिषद कार्यालय, ,यवतमाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महेश अरविंद मंचलवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | न्यु वारको सिटी वाधवाणी ,फारमॅसी कलेजचे, पाठीमागे धामणगाव,यवतमाळ ,अवधूतवाडी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | न्यु वारको सिटी वाधवाणी ,फारमॅसी कलेजचे, पाठीमागे धामणगाव,यवतमाळ ,अवधूतवाडी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामदास नागु चंदणकर | | | 1. वडगाव रोड घर न 05,कोल्हे लेआऊट ,यवतमाळ, अवधूतवाडी,यवतमाळ,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक व्हीवो व्ही 27कंपनीचा मोबाईल | 15,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 50,000 | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

65,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अप क्र. /2024 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 फिर्यादी-महेश अरविंद मंचलवार, वय 48 वर्ष, धंदा नोकरी, पद ग्रामसेवक नेमणुक पंचायत समिती आर्णी जिल्हा यवतमाळ रा. न्यु वारको सिटी वाधवाणी फार्मसी कॉलेजचे पाठीमागे धामणगांव रोड यवतमाळ ता. जिल्हा यवतमाळ आरोपी - रामदास नागु चंदणकर, वय 57 वर्षे, पद विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत विभाग जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ (प्रभारी सहायक गट विकास अधिकारी) रा. प्लॉट क्र. 05, कोल्हे लेआट, भाग 2, वडगांव रोड यवतमाळ घटनास्थळ - जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ ता. जि. यवतमाळ घ.ता.वेळ -दि. 22/12/2023चे 15/19वा.ते.16/45वा. पावेतो दा.ता. वेळ -दि.30/04/2024चे जप्त मुद्देमाल - नगदी 50,000/-रुपये व एक व्हीवो व्ही 27कंपनीचा मोबा ईल किंमत15000 रुपये हकीकत - आलोसे रामदास नागु चंदणकर, वय 57 वर्षे, पद विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत विभाग जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ (प्रभारी सहायक गट विकास अधिकारी) रा. प्लॉट क्र. 05, कोल्हे लेआट, भाग 2, वडगांव रोड यवतमाळ यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन आपले कायदेशिर कर्तव्य पार न पाडता दि.22/12/2023रोजी पडताळणी कार्यवाही दरम्याण पंचा समक्ष तक्रार दार यांचे नियमबाह्य झालेले निलंबन हे चौकशी अती रद्द करुन तक्रार दार यांना पुन:स्थापीत करण्याकरीता श्री जालीदर आभाळे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत )यांचे करीता 50,000/-रुपयाची लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्याचे मान्य केले वरुन पो स्टे ला गुन्हा नोद

कायमी पोहवा /1139वाघाडे तपास - PSI फुसे मॅंडम टिप -फिर्याद मधील शब्द 8000 पेक्षा जास्त असल्याने फिर्याद ची प्रत FIR मागे जोडण्यात येते

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Naresh Ramesh Randhir(I (Inspector)) / PCMH86962 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Naresh Ramesh Ran
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH86962

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

ला.प्र.वि., यवतमाळ
दिनांक: ३०/०४/२०२४

# फिर्याद

मी महेश अरविंद मंचलवार, वय ४८ वर्ष, धंदा नोकरी, पद ग्रामसेवक नेमणुक पंचायत समिती आर्णी जिल्हा यवतमाळ रा. न्यु वारको सिटी वाधवाणी फारर्मसी कॉलेजचे पाठीमागे धामणगांव रोड यवतमाळ ता. जिल्हा यवतमाळ नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहतो.

श्री. रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांनी स्वत: करीता तसेच श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकरीता मला लाचेची मागणी केल्याने, मी दिनांक २२/१२/२०२३ रोजी माझे मित्र व सहकारी श्री. राजेंद्र खरतडे ग्रामसेवक, श्री. राजेंद्र महल्ले ग्रामसेवक व श्री. सुधीर क्षीरसागर ग्रामसेवक यांचेसह लाच मागणीची तक्रार देणेकरीता आलो असुन पुढील प्रमाणे तक्रार देत आहे.

मी सन २००६ मध्ये ग्रामसेवक (कंत्राटी) या पदावर पंचायत समिती पांढरकवडा येथे लागलो. मी माहे जुन २०२२ मध्ये ग्रामसेवक या पदावर पंचायत समिती कार्यालय आर्णी येथे बदलुन आलेलो होतो, तेव्हा माझेकडे ग्रामपंचायत उमरी ईजारा येथील कार्यभार देण्यात आलेला होता. श्री.गणेश बाब्या राठोड रा. उमरी ईजारा यांनी दिनांक ०६/१०/२०२२ रोजी केलेल्या ऑनलाईन प्रधानमंत्री पोर्टलवर तक्रारीमध्ये ग्रामपंचायत उमरी ईजारा येथे १४ व्या वित्त आयोगामधुन बसविण्यात आलेले जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वयीत केले नाही, जनावरांच्या पिण्याचे पाण्याचे टाके बांधकाम न करता पैसे परस्पर काढुन भ्रष्टाचार केल्याच्या आक्षेपाची तक्रार केली होती. यानंतर सदर तक्रारीचे चौकशीचा अहवाल श्रीमती जयश्री वाघमारे, गटविकास अधिकारी पंचायत समिती आर्णी यांनी त्यांचे पत्र क्रमांक पंसआ/पंचा/वि अप/१०९/२०२३ दिनांक २१/०९/२०२३ अन्वये मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद यवतमाळ यांना सादर केला असता मा. डॉ. मैनाक घोष, भा.प्र.से मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांनी त्यांचे आदेश क्रमांक यजिप/साप्रवि/पंचा/स्था–२/कावि/ २८१३/२३ यवतमाळ जिल्हा परिषद यवतमाळ दिनांक ०७/११/२०२३ अन्वये मला ग्रामपंचायत उमरी ईजारा पं.स.आर्णी येथील विविध खात्यामधुन परस्पर रक्कमा काढुन काम न करता गैरव्यवहार केल्यासंदर्भात आरोप ठेवुन मला निलंबीत करण्यात आले आहे. यानंतर मी दिनांक १०/११/२०२३ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना माझेवर झालेल्या अन्यायपूर्वक निलंबनाचा आदेश रद्द बाहय करणेबाबत विनंती अर्ज दिला तसेच दिनांक ०७/१२/२०२३ रोजी पुन्हा मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) जिल्हा परिषद यवतमाळ यांना ग्रा.पं.उमरी ई येथे माझे कार्यकाळातील कामाच्या चौकशीच्या अनुषंगाने प्रस्तावित केलेली चौकशीच्याबाबत विनंती अर्ज दिला. त्यावरून मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) जिल्हा परिषद यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्रमांक यजिप/पंचा/आस्था २/कावि/२९९०/२०२३ दिनांक ०४/१२/२०२३ अन्वये गटविकास अधिकारी पंचायत समिती आर्णी यांना फेर तपासणी/ चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत आदेशीत केले आहे. यानंतर मी दिनांक १२/१२/२०२३ रोजी श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) जिल्हा परिषद यवतमाळ यांना जाउन भेटलो व माझेवर झालेल्या अन्यायाची फेर तपासणी/ चौकशी करून मला चौकशीचे अनुषंगाने (निलंबन मधुन) पुर्न:स्थापीत करून घेण्याची विनंती केली. तसेच मी माझे प्रकरणाची फाईल तयार करणारे श्री. रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना भेटलो असता त्यांनी मला म्हटले की, "तुमचे काम थोडे कठीण आहे तुम्ही काही लक्ष देत नाही" तेव्हा मी त्यांना म्हटले की, "साहेब मी आता निलंबीत आहे खुप अडचण चालली" तेव्हा श्री चंदणकर यांनी मला "तुम्ही काही टेन्शन घेउ नका साहेबांची अपेक्षा आहे तुमच्या कडुन तुम्ही फक्त एक लाख रूपये देउन दया बाकी मी पाहतो" यावर मी नाईलाजाणे श्री.चंदणकर यांना पाच हजार व श्री.आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दहा हजार दिले. तेव्हा श्री. चंदणकर यांनी मला म्हटले की, "मी साहेबांसोबत बोललो साहेबांची जास्त अपेक्षा आहे तुमच्या कडुन तुम्ही अजुन पंन्नास हजार रूपये घेउन या" यावर मी त्यांना नाईलाजाने हो म्हटले, तेव्हाच श्री.आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक यजिप/साप्रवि/पंचा/आस्था २/१०८३/२०२३ दिनांक

१२/१२/२०२३ अन्वये दोन सदस्यांची समिती गठीत करून फेर चौकशी अहवाल तात्काळ सादर करण्यास सांगीतले. तरी श्री. रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ हे मला स्वत: करीता तसेच श्री.जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकरीता माझे नियंम बाहय झालेले निलंबन हे चौकशीअंती रद्द करून मला पुर्न:स्थापीत करण्याकरीता ५०,०००/– रूपये लाचेची मागणी करीत आहेत. मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी त्यांचे विरुध्द दिनांक २२/१२/२०२३ रोजी लाच मागणीची तक्रार दिली.

माझे तक्रारीची पडताळणी करणेकरीता अणुविद्युत अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ येथुन पंच क्रमांक १) म्हणुन श्री. रवि रामदास जयस्वाल, पद अधिव्याख्याता व पंच क्रमांक २) श्री. श्रीकांत भानुदास काळे, पद अधिव्याख्याता असे दोन शासकीय पंच घेउन हजर आले. माझी तोंडी व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचानी व पो.नि. कारेगावकर यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली व श्री. रवि रामदास जयस्वाल यांना पंच क. १) म्हणुन ठेवण्यात आले. पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे सॅनडिस्क कंपनीचे ३२ जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. तसेच व्हॉईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करून दाखविण्यात आले, तसेच माझा, पंच व पो.नि. कारेगावकर यांचा कार्यवाही करीता हजर असल्याचा आवाज ध्वनीमुद्रीत करण्यात आला, सविस्तर कार्यवाही पडताळणी पुर्व प्रमाणे करण्यात आली दिनांक २२/१२/२०२३ रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक श्री.रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी यांनी माझे नियम बाहय झालेले निलंबन हे चौकशीअंती रद्द करून मला पुर्न:स्थापीत करण्याकरीता श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकरीता ५०,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे मान्य केले. तसेच श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी तक्रारदार श्री. महेश मंचलवार यांना चौकशी अहवाल येवु दया तेच्याशिवा होत नाही असे सांगितल्याने सर्वानुमते मी सांगीतल्यावरच पुन्हा पडताळणी करण्याचे ठरले.

दिनांक १४/०३/२०२४ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ येथे हजर येवुन माझे विरूध्दच्या चौकशी बाबतचा अहवाल जिल्हा परिषद कार्यालय यवतमाळ येथे आला आहे, तसेच श्री. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे त्यांचे कार्यालयात हजर असुन माझे तक्रारीची पडताळणी पुन्हा करण्यात यावी अशी विनंती केल्याने माझे विनंती वरून सर्वानुमते मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकरीता जिल्हा परिषद कार्यालय यवतमाळ येथे मला व पंच क. १) श्री. जयस्वाल यांना लोकसेवक श्री.जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची भेट घेणे करीता जिल्हा परिषद कार्यालय यवतमाळ येथे दुचाकी वाहनाने कमांक एम एच २९ एम.९६४६ या वाहनाने रवाना केले. ती वेळ ११.५६ वाजताची होती. मला व पंच क १) श्री. जयस्वाल यांचेसह श्री. आभाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेणेकरीता त्यांचे कार्यालयात गेलो असता तेथे मी पंच क १ श्री. जयस्वाल यांचे समक्ष मी जिल्हा परिषद मधील दुसऱ्या मजल्यावरील श्री. आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे कॅबीन जवळ गेलो तेव्हा पंच कमांक १) श्री. जयस्वाल हे सुध्दा माझे मागे मागे आले, यानंतर मी श्री. आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कॅबीनचे आतमध्ये गेलो. तेव्हा पंच क १) श्री.जयस्वाल हे कॅबीनचे बाहेर उभे होते. यानंतर मी व श्री. आभाळे यांनी आपसात चर्चा केली चर्चेदरम्यान मी श्री. आभाळे यांना म्हटले की," येवु सर...."यावर श्री.आभाळे यांनी मला म्हटले की,"बोला मंचलवार साहेब......"यावर मी श्री.आभाळे यांना म्हटले की,"साहेब ते चौकशी अहवाल आलाना आपला" यावर श्री.आभाळे यांनी मला म्हटले की,"कुठ आला.."यावर मी श्री. आभाळे यांना म्हटले की, "सत्तावीस तारीखेलाच आला सर.."यावर श्री. आभाळे यांनी मला म्हटले की, "शंभर टक्के हे फायनल करून टाकतो...." यावर मी श्री. आभाळे यांना म्हटले की, "अहवालावर सर.. काय झालं थोड पाहाल असतं सर...."यावर श्री. आभाळे यांनी मला म्हटले की, "गुल्हाणे अन हे आपले चंदनकर त्यांना बोलावुन ते प्रकरण....हे काय हे पण काढायचे आहे न मला याच्यातपण तुमच असेल कदाचीत किंवा मग ते गेलं असेल ही फाईल लिहली तुमची राळेगावची मला आठवतं....." यावर मी श्री. आभाळे यांना म्हटले की, " चौकशी अहवालाले चार महीने लागले न साहेब" यावर श्री. आभाळे यांनी मला म्हटले की, "करतो मी काही टेंशन नका घेवु.....टेंशन नका घेवु.....अशाप्रकारे चर्चेदरम्यान दिनांक १४/०३/२०२४ रोजी श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी मला माझे नियम बाहय झालेले निलंबन हे चौकशीअंती रद्द करून मला पुर्न:स्थापीत करण्याबाबतचा अहवाल श्री. चंदनकर, प्रभारी सहायक गटविकास अधिकारी व श्री. गुल्हाने, लिपीक हे आल्यावर अहवाल पाहु असे

सांगीतले. यानंतर मी कॅबीनचे बाहेर आलो व तिसऱ्या माळयावर जावून श्री. गुल्हाने यांचे बाबत तेथील कर्मचारी यांना विचारपुस केली असता त्यांनी श्री. गुल्हाने हे बाहेरगावी असल्याबाबत समजले, तसेच श्री. चंदनकर हे सुध्दा कार्यालयात हजर नसल्याबाबत मला माहिती मिळाली. यानंतर मी व पंच क्र.१) श्री.जयस्वाल असे दुचाकी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय, यवतमाळ येथे परत आलो असता माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस निरीक्षक श्री.कारेगावकर यांनी घेउन बंद केला, ती वेळ १२:४३ वाजताची होती. पो.नि.कारेगावकर यांनी मला व पंच क्र १ यांना रवाना केल्यापासुनची हकीकत विचारली असता मी व पंच क्र १ यांनी सविस्तर हकीकत पंचासमक्ष सांगितली. सविस्तर कार्यवाही पडताळणी कार्यवाही प्रमाणे करण्यात आली. पडताळणी दरम्यान पंचासमक्ष श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी मला माझे नियम बाहय झालेले निलंबन हे चौकशीअंती रद्द करून पुर्नःस्थापीत करण्याबाबतचा अहवाल श्री. चंदनकर, प्रभारी सहायक गटविकास अधिकारी व श्री. गुल्हाने, लिपीक हे आल्यावर अहवाल पाहु असे सांगितल्याने सर्वानुमते मी सांगीतल्यावर पुन्हा पडताळणी करण्याचे ठरले.

दिनांक १९/०३/२०२४ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ येथे हजर येवुन श्री. आभाळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे त्यांच्या कार्यालयात हजर असल्याबाबत मला माहिती मिळाली आहे. तेव्हा माझे तक्रारीची पडताळणी करण्यात यावी अशी विनंती केल्याने माझे विनंती वरून सर्वानुमते मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकरीता मला व पंच क्र. १) श्री. जयस्वाल यांना श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची भेट घेणे करीता जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथे माझी मारूती सुझुकी जिक्सर कंपनीची दुचाकी वाहन क्रमांक एम एच २९ एएस ९११५ या वाहनाने रवाना झालो. ती वेळ १७:१९ वाजताची होती. **"मी,** पंच क्रमांक १) श्री.जयस्वाल असे दुचाकी वाहनाने जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथे गेलो व दुचाकी वाहन कार्यालयाचे बाहेर उभे केले, यानंतर मी जिल्हा परिषद मधील दुसऱ्या मजल्यावरील श्री. आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे कॅबीन जवळ गेलो तेव्हा पंच क्रमांक १) श्री. जयस्वाल हे सुध्दा माझे मागे मागे आले. यानतर मला समजले की, श्री.आभाळे यांचे कॅबीनमध्ये मिटींग चालु असल्याबाबत ची माहिती मिळाली. तेव्हा मी व् पंच क्रमांक १ श्री. जयस्वाल असे श्री. आभाळे यांचे कॅबीनजवळ मिटींग संपण्याची वाट बघत होतो. बराच वेळाने मिटींग संपल्यानंतर मी श्री आभाळे यांची भेट घेण्याकरीता कॅबीनमध्ये गेलो तेव्हा पंच क्र १) श्री.जयस्वाल हे कॅबीनचे बाहेर उभे होते. यानंतर मी व श्री. आभाळे यांनी आपसात चर्चा केली चर्चेदरम्यान मी श्री. आभाळे यांना म्हटले की,**" सर ते फाईल टाकली म्हणे न आपली ...."** यावर श्री.आभाळे यांनी मला म्हटले की,**" फाईल त गेली पण... तुमची फाईल कालच गेली "** यावर मी श्री. आभाळे यांना म्हटले की,**"चंदनकर साहेबानले भेटुन घेवु का तुम्ही म्हटलं होत ते"** यावर श्री. आभाळे यांनी मला म्हटले की, **"नही नही कशाला. फाईल गेली न."** अशाप्रकारे चर्चेदरम्यान दिनांक १९/०३/२०२४ रोजी श्री.जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी मला माझे नियम बाहय झालेले निलंबन हे चौकशीअंती रद्द करून मला पुर्नःस्थापीत करण्याबाबतचा अहवालाची फाईल दिनांक १८/०३/२०२४ रोजीच पाठविल्याचे सांगीतले. यानंतर मी कॅबीनचे बाहेर आलो व पंच क्र. १) श्री. जयस्वाल असे दुचाकी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय, यवतमाळ येथे परत आलो असता माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस निरीक्षक श्री. कारेगावकर यांनी घेउन बंद केला, ती वेळ १९:०५ वाजताची होती. पो.नि.कारेगावकर यांनी मला व पंच क्र १ यांना रवाना केल्यापासुनची हकीकत विचारली असता मी व पंच क्र १ यांनी सविस्तर हकीकत पंचासमक्ष सांगितली. सविस्तर कार्यवाही पडताळणी कार्यवाही प्रमाणे करण्यात आली.

दिनांक ३०/०४/२०२४ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ येथे हजर आलो व पोनि श्री. कारेगावकर यांना भेटुन श्री. रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी हे त्यांचे कार्यालयात हजर आहेत व ते आज माझेकडुन पैसे स्विकारू शकतात तरी सापळा कार्यवाहीचे आयोजन करावे अशी विनंती मी केल्यावरून सर्वानुमते आज सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले. त्याकरीता पोनि कारेगावकर यांनी शासकिय पंच बोलाविले व दोन्ही पंच ला.प्र.वि. कार्यालय यवतमाळ येथे हजर आल्यानंतर पो.नि.कारेगावकर यांनी पंचांना, मला व पथकातील सर्व अंमलदार यांना सापळा कार्यवाही दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या तसेच माझे जवळील श्री. रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी यांना देणे असलेली लाचेची रक्कम

५०,०००/— रू. मी पंचासमक्ष पो.नि.कारेगावकर यांना दिली असता त्या नोटांचे टिपण तयार करून त्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली.

यानंतर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टाचे आतमध्ये लेसव्दारे लटकवीला ती वेळ १५.४८ वाजताची होती. मला व पंच क्र. १) श्री. जयस्वाल यांना श्री. रामदास चंदणकर यांची भेट घेणे करीता जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथे माझी मारूती सुझुकी जिक्सर कंपनीची दुचाकी वाहन क्रमांक एम एच २९ एएस ९१९५ या वाहनाने रवाना केले व आमचे लगोलग उर्वरीत सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार हे त्यांचे वाहनाने जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथे येवुन दबा धरून आडोशाला थांबले. मी व पंच क्र. १ असे श्री. रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ येथील कार्यालय येथे गेलो व श्री. रामदास चंदणकर यांची भेट घेतली व निलंबन आदेश रद्द करणेसंबंधाने विचारणा केली असता त्यांनी मला माझेकडे फाईल पेंडींग नाही, माझे काम झाले, पुढे फाईल गेली आहे असे म्हटले व त्यांना ठरल्याप्रमाणे लाच रक्कम घेण्यासंबंधाने विचारले असता त्यांनी मला आता काही विषय नाही असे म्हणून माझेकडुन लाच रक्कम स्विकारली नाही. त्यानंतर मी पो.नि.विनायक कारेगावकर यांचे व पथकाजवळ परत आलो माझेजवळील व्हॉईस रेकॉर्डर पो.नि.श्री.कारेगावकर यांनी ताब्यात घेउन बंद केला, ती वेळ १६.१५ वाजताची होती. यानंतर मी पंचासमक्ष पो.नि.श्री.कारेगावकर यांना सांगितले की, श्री. रामदास चंदणकर यांना माझेवर संशय आल्याने ते आता माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत. तेव्हा त्यांचेवर योग्य कार्यवाही करण्यात यावी असे मी पोनि कारेगावकर यांना सांगितले.

त्यावरून पो.नि.विनायक कारेगावकर, पो.नि. अमित वानखडे व पथकातील अंमलदार यांनी तेथे लगेच श्री. रामदास चंदणकर यांचे कार्यालयात जावुन त्यांना ताब्यात घेतले सविस्तर कार्यवाही दिनांक ३०/०४/२०२४ रोजीचे सापळापुर्व व सापळा कार्यवाही पंचनामा प्रमाणे करण्यात आली.

एकंदरीत दिनांक २२/१२/२०२३ रोजी १५:१९ वा ते १६:४५ वाजता पडताळणी दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक श्री. रामदास चंदणकर, प्रभारी सहायक गट विकास अधिकारी यांनी मला नियम बाहय झालेले निलंबन हे चौकशीअंती रद्द करून मला पुर्नःस्थापीत करण्याकरीता श्री. जालींधर आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकरीता ५०,०००/— रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन श्री. रामदास नागु चंदणकर, वय ५७ वर्षे, पद विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत विभाग जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ (प्रभारी सहायक गट विकास अधिकारी) रा. प्लॉट क्र. ०५, कोल्हे लेआउट, भाग २, वडगांव रोड यवतमाळ यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पथकासह पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे येऊन तक्रार देत असुन माझी वरीलप्रमाणे तक्रार मराठीत टंकलीखीत केली असुन, सदर तक्रार मला वाचुन दाखविण्यात आली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

PI

(विनायक कारेगावकर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ

**सही**

महेश अरविंद मंचलवार